विजय अष्टेकर

# चौथे पर्व



॥ श्री गजानन प्रसन्न ॥

# चौथे पर्व

**चौथे पुस्तक म्हणून चौथे पर्व !**

पुढचे पुस्तक कदाचित खरोखर पर्व ठरु शकेल कारण कविता लिहिण्याचा वेग अगदीच मंदावला आहे. मुख्य कारण हे की शेरो-शायरी चे व्यसन लागलयं, अर्थातच हिंदी. मराठीत शायरी करायला खूपच मर्यादा आहेत आणि शब्द भांडार समृद्ध असणे आवश्यक आहे ज्याची वानवा आहे. असो.

या संग्रहात देखील मराठी, हिंदी, इंग्रजी अशा तिन्ही भाषेतील कविता आहेत. विषयही वेगवेगळे आहेत.

काही प्रासंगिक आहेत. काही ठरवून लिहिलेल्या आहेत. व्यक्तिगत आहेत तशा प्रतीकात्मक सुद्धा आहेत. परीक्षेसाठी आपण अभ्यास करतो आणि परीक्षेचा निकाल हातात आल्यावर किंवा कधी कधी उत्तर पत्रिका लिहून झाल्यावर आपल्याला कळतं की खरंच किती ज्ञान आपण मिळवलं, जे वाचलं, ऐकलं त्याचं किती आकलन झालं ?

लेखनाचं थोडं तसंच आहे. मग ती कविता असो, कथा अथवा कादंबरी लिहिल्याशिवाय आपल्याला कळत नाही. आपण काय आत्मसात केलंय आणी आपल्याला काही पुनःनिर्माण करता येते आहे का ज्याला आपण इंग्रजीत क्रिएटिव्ह, कन्स्ट्रक्टिव्ह म्हणतो असे काही शक्य आहे का हे लिहिल्या शिवाय कळणार नाही.

मार्मिक लिहितांना कधी कधी लेखणी घसरते आणि थोडं जहाल लिहिलं जातं पण ते सत्य असतं हे वाचक मान्य करतात.

सुचलेले विचार अर्थपूर्ण असतील तर ते मनाला भावतात. असेच लिहून काढलेले विचार मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील ज्याला इंग्रजीत Quotes म्हटलं जाऊ शकतं दिनदर्शिका स्वरुपात ३६६ दिवसांसाठी तयार केलेत. सध्या व्हॉट्स ॲप वर स्टेटस वर नमूद करतो आहे तारखेप्रमाणे.

विजय अष्टेकर

# अनुक्रमणिका



अमिताभ बच्चन ........................................ १
आरक्षणाचे संरक्षण .................................. ४
बेकरार दिल तू गाए जा .......................... ५
मेरी आवाज सुनो .................................... ६
शिकायत-ए-मोहब्बत ............................... ७
सत्व परीक्षा ............................................. ८
मुड मुड के न देख................................... ९
पुणे तेथे काय उणे .................................. १०
विचारांचा भुंगा ........................................ ११
प्रेमपत्र ..................................................... १२
व्यथेची कथा ............................................ १३
तू मी ........................................................ १४
प्रेमाचं एक................................................ १५
मोहब्बत क्या है ....................................... १६
अनाहूत तगमग ......................................... १७
ती कविता ................................................ १८
कोई मेरे दिल से पूछे .............................. १९
फिरुनी पुन्हा जन्मेन मी ......................... २०
अर्धशतकी सचिन...................................... २१
CG... An Iron Man .......................... २२
निफ्टी, डू डाय डू..................................... २३
एक तप .................................................... २४
दोस्ताना ................................................... २५
कळत नकळत ........................................... २६
कविता कुठे आहे ..................................... २७
फिर अजनबी ............................................ २८
फिर वही दिल लाया हूँ............................. २९
तत्वज्ञानाची ऐशी तैशी ............................ ३०
Take Care ........................................ ३१

एक सीधा साधा आदमी बनना था नायक
हाथ की लकीर ने बना दिया महानायक
मेहनत की उँचाई जैसी
सफलता भी मिली उँचाई जैसी

अँग्री यंग मॅन का किताब मिला
अकेला सुपरस्टार होने का सबूत मिला
किस्मत की देन थी आवाज
डायलॉग डिलिव्हरी का अपना ही अंदाज
वन मॅन इन्डस्ट्री की पहचान थी
चहितों के सपनों के हीरो की निशानी थी

कामयाबी के पीछे है कड़ी मेहनत
पाँव है जमीनपर, इसलिए कामयाबी है सर पर
विनयशीलता का कोई हिसाब नहीं
व्यक्तिमत्व का कोई जवाब नहीं

पर्देपर आते ही तालियाँ बरसती है
डायलॉग डिलिव्हरी से बिजलियाँ चमकती है
हाथ पाँव हिलाने से मुजरिम कांपते है
कॉमेडी करने से लोग हँसते है



पागल लोग एन्ट्री पर नोटों की बरसात करते है
मुझ जैसे लोग चाय-पानी का बंदोबस्त करते है
इक झलक के लिये बरसों इन्तजार करते है
केबीसी में मिले तो जन्म का सार्थक मानते है

यश देखा अपयश सहा
कामयाबी देखी अपमान सहा
दौलत कमाई हालाखी देखी
दिल पे चोट खाई बदन पे जख्म खाये
लोगों के प्यार और आशीर्वाद से हर जंग जीत कर आये
केबीसी के माध्यम से सारी दुनिया पर छाये

तुम आये तुमने देखा, तुम जीते
अपनी अदाकारी से सबको अपना बनाया
अन्याय से पीडित लोगों के तुम मसीहा बने
मेहनत से सफलता मिलती है यह पाठ पढ़ाया
मीठी जुबाँ से सबको चुपकी दी
वक्त और जुबाँ के दुश्मनों को सबक सिखाया

लोग तुम्हें अपना आदर्श मानते है ये उनकी फितरत है
उनके भावनाओं की कद्र करना ये तुम्हारी आदत है
कोई भी किरदार पूरी लगन से करना तुम्हारी खासियत है
दूसरों के काम में दखल अंदाजी न करना ये रिवायत है

अभिनय के तुम शहेनशाह हो
इन्डस्ट्री के तुम अकेले सिकंदर हो
चहेतों से तुम्हारा याराना है
जीने में तुम्हारी शान है
हमें तुम्हारा अभिमान है

देशप्रेमी ये तुम्हारी पहचान है
इन्किलाब जिंदाबाद ये तुम्हारा नारा है
ॲक्शन में तुम बेमिसाल हो
सबसे तुम्हारा दोस्ताना है
परदे के बाहर दो और दो पाँच का हिसाब चूका
तब तुम अकेले थे
गलत फैसले का जुर्माना तुमने भरा

अभिनय यही तुम्हारी शक्ती है
इंटस्ट्री के तुम डॉन हो
सातवा हिन्दुस्तानी ये ही सच्चा जादूगर है

कालिया ने गंगा की सौगंध ली
खून पसीना एक किया
आँखों में शोले थे
हाथ में त्रिशूल था
हाथ-पाँवों की जंजीर तोड दी
रास्ते की हर दीवार गिरा दी
तब जाके नसीब के दरवाजे खुले

मिली के सिलसिले ने मि. नटवरलाल मजबूर हुआ
कभी कभी कहते कहते हमेशा के लिये गिरफ्तार हुआ

# आरक्षणाचे संरक्षण

अठरा पगड जातींचा देश
असुरक्षित माझे जीवन
बाकीच्यांनी करावे सहन
मला हवे आरक्षण

मी जाळपोळ करणार
मी नुकसान करणार
ठीक नाही हे लक्षण, तरी
मला हवे आरक्षण

मी काम नाही करणार
मी फक्त बसून खाणार
मी करणार राजकारण
मला हवे आरक्षण

आरक्षणाच्या कुबड्या घेऊन
शर्यत मी धावणार
असो अथवा नसो शिक्षण
मला हवे आरक्षण

सर्व सामान्यांना कळत नाही
जातीयतेचे राजकारण
टक्केवारीने केवळ फूट पडते
मला हवे आरक्षण





# बेकरार दिल तू गाए जा...

कर रहे थे हम
किसी का इंतजार
मालूम नही था
उनको है इन्कार

अचानक नींद खुली
और बिखर गए सपने
तब जाके पता चला
सपने होते है बेगाने

पहले भी थे अकेले
आज भी है अकेले
कोई साथ दे न दे
चलते रहना है यूँ अकेले अकेले

कारवाँ तो छूट गया
मंजिल का कोई पता नही
हर कोई बहाना बनाता है
पास कोई बुलाता नही

दर्द तो सभी देते है
दवा कोई देता नही
तोडकर दिल चल देते है
जैसे कभी पहचानते नही

बेकरारे दिल तू गाए जा...



# मेरी आवाज सुनो...



मेरे मनके मीत
सुनो इस दिलके गीत
तुम्हे निभानी है प्रीत
भुलाकर दुनिया की रस्मो रीत

मेरी मुहब्बत का इम्तहान न लो
इस दिल को और न तडपाओ
तोडकर सारे बंधन
मेरे पास चले आओ

इंतजार है तुम्हारा कई जन्मोंसे
गुजरे है आज इश्क में इस मकाम से
इन्तहा हो गई अब इंतजार की
रहे जाये ना जिन्दगी बस तकरार की

मुझको इस तरह तुम भुला न देना
याद करना मुश्किल हो जाये
छोडकर चल देंगे हम तुम्हे
वापस आना मुश्किल हो जाये

गुजर रही है जिन्दगी कुछ इस तरहा
जैसे किसी की आरजू न हो
चल पडे है अकेले इस तरहा
जैसे कारवाँ छूट गया हो

# शिकायत-ए-मोहब्बत

मेरे दिलको आज चैन क्यूँ नही
रैन अभी बाकी है फिर नींद क्यूँ नहीं

तेरे आनेकी कोई सूरत नहीं
फिर मुझे इंतजार क्यूँ है
तेरे जानेका कोई गम नहीं
फिर मुझे तकरार क्यूँ है

मेरे दिलको आज चैन क्यूँ नहीं
रैन अभी बाकी है फिर नींद क्यूँ नहीं

मायुसे के इस अंधेरेमें
नजर कुछ आता नहीं
इक तेरा गम बाकी है
मन को अब कुछ भाता नहीं



मेरे दिलको आज चैन क्यूँ नहीं
रैन अभी बाकी है फिर नींद क्यूँ नहीं

इश्क मेरा अब एक कहानी है
अपने आपको ही सुनानी है
बस येही मेरी जिंदगानी है
ऐ खुदा क्या ये तेरी मेहेरबानी है

मेरे दिलको आज चैन क्यूँ नहीं
रैन अभी बाकी है फिर नींद क्यूँ नहीं

# सत्व परीक्षा

सहज सोपं आयुष्य
माझं का असावं
विचार करुन मन थकतं
उलगडणारं कोडं मला का पडावं ?

प्रेमाचे रंग गहिरे का असावेत
मैत्रीचे धागे का जुळावेत
पडलेल्या प्रश्नांची उत्तरे का मिळावीत
मिळालेली उत्तरे अचूक का ठरावीत

आयुष्याला क्लायमॅक्स असावा की नसावा
असेल तर तो सुरुवातीलाच का नसावा
क्लायमॅक्स संपल्यावर पहायला काय उरते
क्लायमॅक्स चे सार आयुष्याला पुरते

मुंगी होऊन साखर खावी की
हत्ती होऊन ओंडके व्हावेत
कुत्र्यासारखं इमानदार असावं की
मांजरासारखं बेईमान रहावं

प्रत्येक प्रश्न इतका सोपा की
उत्तर पत्रिका कोरीच राहते
पास होणार की नापास कळत नाही
वेळ मात्र संपलेली असते

# मुड मुड के न देख



वो शाम कुछ अजीब थी
वो आज भी करीब है
कभी पराये भी थे अपने
आज अपने भी है पराये।

नयी उमंगें थी
खयालात थे सुहाने
कुछ सपने भी थे
जो आज है बेगाने।

किसी को है शिकायत
मुझे भी तो है गिला
कौन जाने कैसे शुरु हुआ
बातों का ये सिलसिला।


लोग कहते है
जो होता है अच्छे के लिये
कोई मुझे ये बताये
जो नहीं होता है वो किस लिये।

दिन महिने साल गुजर गये
खट्टी मीठी यादे छोड गये
मुडके न देखो यारो
सब अपने रस्ते निकल गये।





# पुणे तिथे काय उणे...
# काढत राहू उणे दुणे ....



पुणे तिथे का जावे
आपली पायधूळ झाडण्यासाठी

पुणे तिथे काय पहावे
शैक्षणिक पाट्या

पुणे तिथे काय गावे
नेहमीचेच रडगाणे

पुणे तिथे काय म्हणावे
आमची कुठेही शाखा (पुणे) नाही

पुणे तिथे काय चालवावे
वाहन सोडून काहीही

पुणे तिथे काय शिकावे
कसे न बोलावे

पुणे तिथे काय वाजवावे
हॉर्न आणि दुसरं काय


पुणे तिथे कोणास भेटावे
कानफाट्या दीडटांगे बंधू कॉपीवाले

पुणे तिथे काय खावे
राष्ट्रीय खाद्य वडापाव



पुणे तिथे काय करावे
फुशारक्या मारत रहावे





# विचारांचा भुंगा

शिंक आली की आम्ही
कोरोना जाहीर करतो
अंग गरम लागले की
मनाने आम्ही आय.सी.यू. त असतो


मन पोखरले गेले की
शरीराला वेळ लागत नाही
एकाला बाधा झाली की
घराला वेळ लागत नाही

भुंगा कोणताही असो
शोषणच करतो
मन कितीही कणखर असले तरी
भुगाच पडतो

भित्यापाठी ब्रह्मराक्षस
कारण पालथ्या घड्यावर पाणी
कधी कधी तो ही घाबरतो
कारण मागे आम्ही असतो



विचारांची कधी कधी गंमत असते
शीड नसलेल्या नावेसारखे भरकटतात
त्यांना काही धरबंधच नसतो
भुंगा मात्र आपले काम करतो



# प्रेमपत्र

लिहायला घेतलं
प्रश्न पडला कोणाला लिहावं
म्हटलं तर अनेक आहेत
म्हटलं तर कोणीच नाही

व्हॅलेन्टाईन डे जवळ आला
तशी धडधड वाढू लागली
लिहावं की नको
लिहीलं तर द्यावं की नको

होकार मिळेल की नकार
ह्याच विचारात वर्ष सरली
अजूनही आशा संपलेली नाही
जरी वयाने पन्नाशी गाठली

लोक काय म्हणतील
या विचाराने हात थबकतो
न लिहावे तर
जीव खालीवर होतो

एकदाचे लिहून पूर्ण झाले
धाडस करुन देवून टाकले
एवढ्याश्या गोष्टीसाठी तपे लोटली
गजराच्या आवाजाने खडबडून जाग आली

# व्यथेची कथा

अपयश आलं की निर्णय चुकीचे ठरतात
यश आलं की तेच निर्णय बरोबर असतात

काठावर बसून
तत्वज्ञान झोडणं सोपं असतं
गटांगळ्या खाल्ल्या की
तेच तत्वज्ञान अंगाशी येतं

नाती जपा नाती जपा
म्हणून कंठकोष करणं सोपं असतं
तीच नाती कंठाचा घोट घ्यायला उठतात
तेव्हा प्राण कंठाशी आले की कळतं

माणसं सांभाळा
उलटली तरी सांभाळा
त्यांनी खड्ड्यात घातलं
तरी सोडू नका कळवळा

# तू मी

तू पूजा मी पुजारी
तू राधा मी हरी

तू गीत मी संगीत
तू आवाज मी अंदाज

तू रुप मी रंग
तू आत्मा मी अंग

तू फूल मी भवरा
तू घुंघट मी सेहरा

तू मीरा मी शाम
तू सीता मी राम

तू धरती मी आकाश
तू मोह मी पाश

मी शायर तू शायरी
मी मन तू माईरी

तू कविता मी कवी
तू किरण मी रवी

तू ओव्हन मी फ्रीज
तू स्टॉर्म मी ब्रीझ



# प्रेमाचं एक...



प्रेमाचं एक भारी असतं...
सतत डोळ्यातून ओसंडून वाहत असतं

प्रेमाच  एक भारी असतं...
व्यक्त करावं तर छातीत धडधडायला लागतं

प्रेमाचं एक भारी असतं...
न व्यक्त करावं तर मन झुरत राहतं

प्रेमाचं एक भारी असतं...
कुणाला कळू नये म्हणून धडपडत राहतं

प्रेमाचं एक भारी असतं...
होकारा बाबत नेहमीच साशंक असतं

प्रेमाचं एक भारी असतं...
स्वत:चं असेल तर ते नेहमीच उच्च कोटीतलं असतं

प्रेमाचं एक भारी असतं...
दुसऱ्याचं असेल तर ते थिल्लरपणा असतं

प्रेमाचं एक भारी असतं...
यशस्वी झालं तर ते आदर्श असतं

प्रेमाचं एक भारी असतं...
अयशस्वी झालं तर ते आपल्या दर्जाचं नसतं

प्रेमाचं एक भारी असतं...
तडजोडीचं ते उत्तम समर्थन असतं



# मोहब्बत क्या है?

अजीब सी कशीश
एक प्यारी सी लगन
अपनेपन का एहसास
बेपनाह चाहत
दिल की धडकन
हुस्न और इश्क का संगम
ख्वाँबोकी दुनिया
खुशीयोंका खजाना
कस्मे और वादोंका सिलसिला
एक जुनुन
दिवानापन
जिन्दगी की बहार
दो आत्माओंका मीलन
मीठी सी चुभन
किस्मत की देन
खुदा की मेहेरबानी
जीने की आरजू
दु:ख भरी दास्तान
सीने में जलन
दर्द का रिश्ता



# अनाहूत तगमग



एवढा कोसळतो आहेस
कसली तगमग आहे की
काय सांगायचंय तुला
कसली खदखद आहे ही

कुठे हरविली ती भावना
केवळ डोळ्याने व्यक्त होणारी
आडात तर खूप आहे
पोह-यात येण्यास संकोचणारी

अंतरंगाची वेध घ्यायला
डोळ्यांचे भाले बोथट झालेत
भावनांचा आवेग थोपवायला
शब्दांचे बाहू क्षीण झालेत

नको वाहूस अपेक्षांचे ओझे
भार हलका करायला कोणी नाही
स्वतःच स्वतःला सावरायचे
वास्तपुस्त करायला कोणी नाही



# ती कविता

एक कविता जी सुचली
पण लिहिली गेली नाही

एक कविता जी लिहिली
पण जमून आली नाही

एक कविता जी जमून आली
पण कुणाला भावली नाही

एक कविता जी भावली
पण स्मरणात राहिली नाही

एक कविता जी स्मरणात राहिली
पण कौतुकास पात्र ठरली नाही

एक कविता जी कौतुकास पात्र ठरली
पण प्रसिध्द झाली नाही

एक कविता जी प्रसिध्द झाली
पण अमर झाली नाही



# कोई मेरे दिल से पूछे



कोई मेरे दिल से पूछे
क्या छुपा है इस दिल में
तस्वीर मेरे दिलदार की

कोई मेरे दिल से पूछे
क्या कहेती है ये वादिया
आज मौसम बडा बेईमान है

कोई मेरे दिल से पूछे
दिल क्यूँ बेकरार है
इश्क पर कोई जोर नही

कोई मेरे दिल से पूछे
जिन्दगी में बहार कब आती है
हुस्न का जब दीदार होता है

कोई मेरे दिल से पूछे
गीत कब मन से उठता है
जब दिल पे ठेस लगती है

कोई मेरे दिल से पूछे
क्या प्यार की कोई उम्र होती है
वो उम्र ही क्या जिसे
प्यार का रोग न लगा हो

ते निरागस डोळे
उत्कट प्रेमाने भरलेले
थेट हृदयाचा वेध घेणारे
कुठे बरे हरवले

माझे मलाच कळेना
कसा विसर पडला
आता शोधून काय उपयोग
फारच उशीर झाला

ओळख होण्यापूर्वीच अनोळखी झालो
जवळ येण्यापूर्वीच दूर गेलो
चूक कोणाची आणि काय झाली
नियतीचीच पुन्हा एकदा सरशी झाली

देव सुध्दा कधी कधी निष्ठुर होतो
आपलेच म्हणणे खरे करतो
एखाद्यावर वर्षाव करतो तर
एखाद्यावर फक्त संक्रातच करतो



कधी भेटू हि शक्यात कमीच
भेटलो तरी ओळख दाखवूच असे नाही
ओळखले तरी बोलण्याची खात्री नाही
पुन्हा सूर जुळतीलच म्हणून नाही

# *अर्धशतकी* **सचिन**

लाकडाचे व्यापारी
मेहनत अपारी
कधीतरी खातात सुपारी
देतात ताणून दुपारी

शिस्तीची जरा जास्तच आवड
स्वयंपाकासाठी काढतात सवड
चटकन रुसतो पटकन फुगतो
नाईलाजाने मग निवळतो

कार्य सिध्दीस न्यायला सचिन पाटणकर
सहल, भोजन ठरवायला सचिन पाटणकर
कुणाची खेचायला सचिन पाटणकर
आचरटपणा करायला सचिन पाटणकर



पन्नाशी गाठली तरी
उत्साह दांडगा आहे
भारतीचा धाक असला तरी
हिरवटपणा बाकी आहे

One gets an inspiration
How to work with dedication

Values and principles is a culture
Relations are developed by nurture

Leadership is another quality
Kind support to all is a speciality

How to balance things is a learning
Gaining rich experience is an earning

He cares for everyone
He gives something to everyone

By age behaviour is elderly
By attitude behaviour is fatherly

Let's have that energy
An approach to work with strategy



टिळकनगर ते कर्वेनगर
५० वर्षांचा प्रवास
संशोधक म्हणून उपाधी लावत
उत्खनन करत आहेत इतिहास

सनदी लेखापाल म्हणून केली नोकरी
आज मितीला हंगामी शेतकरी
अधून मधून गडावर स्वारी
कदाचित उद्या वारकरी

प्रिती माटेशी लग्न काय झालं
वाघाची शेळी झाली
इकडे डोळे मोठ्ठे झाले आणि
फुशारक्या मारण्याची बोलती बंद झाली

काड्या टाकायची सवय तशी जुनीच
कळीचा नारद म्हणा हवं तर
कुणा वाचून काहीच अडत नाही
स्वयंपूर्ण म्हणा फार तर



कविता, लेख, विचार लिहिण्याची सात
वर्षे आज पूर्ण झाली (०९/०८/२०१९)

एक तप

सात वर्षे सरली
कळले पण आणि नाही पण
विचार करता असं वाटतंय
जमले पण आणि नाही पण

तुमचा प्रतिसाद आणि सदिच्छा
यामुळेच इथपर्यंत पोहोचलो
ही वाटचाल चालू ठेवावी
या निर्णयास आलो

फार पाल्हाळ लावणे
हे माझ्या तत्वात बसत नाही
बळेच रचलेल्या मंगलाष्टकांसारखे
कौतुकाचे फटकारे मलाच आवडत नाहीत

कलेची साधना किमान तपाची हवी
मग हवं तर म्हणा मला कवी

# दोस्ताना

खूबसूरत वादियाँ मस्त फिजाये
बहका हुआ मौसम
बरसता हुआ सावन

जब मिल बैठे कुछ यार
हो जाते है लम्हे यादगार

इक हसीन शाम
छलकाये जाम

बातों का सिलसिला
यूँ ही चलता रहे
चाहे जमाना बदले
ये दोस्ताना सलामत रहे

# कळत नकळत

तुझी माझी ओळख तशी जुनी
असे कधी भेटू हे नव्हते ध्यानी मनी

तुझा चेहरा नव्याने समोर येतो आहे
प्रेमाचा हळुवार भास मला होतो आहे

तुझ्या येण्याची चाहूल लागते
आणि छातीची धडधड वाढू लागते

प्रेम नव्या रुपाने सामोरे आले
आणि माझी मी न राहिले

काय बोलावे किती बोलावे
कशाचेच भान रहात नाही
तू बरोबर असशील तर
दुसरे काही स्मरत नाही



मन मोठे विचित्र असते
याची खात्री आज पटली
नकळत माझ्या आयुष्यात डोकावलास
आणि आठवणींच्या पोतडीची गाठ सुटली

# कविता कुठे आहे



काय माहिती कुठे रमलीय
साद तर घातली आहे
अजून प्रतिसाद नाही

विचार करीत असेल
यावे की न यावे

कविता कधी कधी चंचल असते
कधी अचानक उगवते
कधी बोलवूनही येत नाही

कविता मनात असते
कविता विचारात असते
लेखणीतून कागदावर उतरते
डोळ्यातून ह्दयात स्थिरावते

कौतुक करावे तर खुलून येते
उपेक्षा करावी तर रुसून बसते

आता येईल तेव्हा खरे
आपण बरे आपले बरे



# फिर अजनबी

हम कुछ कहेने वाले थे
जुबां फिसल गयी
कुछ और कह बैठे

वो इस तरह से नाराज हो गये
कही और जा बैठे

वो रुठ गये हम मनाने लगे
सिलसिला चलता रहा
वक्त कटता गया
उम्र गुजरती गया

फिर एक मोड आया
रास्ते अलग हो गये

फिर अजनबी हो गये



# फिर वही दिल लाया हूँ

संजोग की बात है
किसी डगर पे साथ चले थे
एक मोड आया
रास्ते अलग हो गये
काफी समय गुजर गया

फिर एक रोज अचानक
उनके दीदार हो गये
दिल फिरसे झूम उठा
पुरानी यादे ताजा हो गयी
इकरारे इश्क बेताब हुआ
कुछ सपने सजाये

क्या पता किसकी नजर लग गयी
वक्त ने फिर करवट ली
एक दिवार खडी हो गयी
फिरसे इंतजार की घडिया

हम भी बडे दिलवाले
ऐसे थोडे ही हार मानेंगे
बाजी जीतकर दम लेंगे





# ॥ तत्वज्ञानाची ॥ ऐशी की तैशी


अन्याय अपमान सहन करा
कारण माणसं जपायचीत
चुका आणि गुन्ह्याला क्षमा करा
कारण नाती जपायचीत

ऐन तारुण्यात परमार्थ स्वीकारा
कारण मिळवायचं काहीच नाही
नवनिर्मितीचा आग्रह धरु नका
कारण बरोबर न्यायचं काहीच नाही

समाजकार्य राष्ट्रकार्य करु नका
कारण वाईटपणा घ्यायचा नाही
राजकारणात पडू नका
कारण लष्काराच्या भाक-या भाजायच्या नाहीत

शिक्षण घेऊ नका पैसे कमवू नका
कारण काहीच नेता येत नाही
असे विकृत जीवन आम्ही जगतो
कारण मरण येत नाही





# Care Taker to Take Care...

# ...... Journey

Change the sequence
See the difference

We are near
But no where

The fact is painful
The act is shameful

Formal dry expressions
A way of impressions

Perhaps lost the feelings
Absence of real willings

Hardly a matter of few pains
Not to think of any gains

